**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५३६/२०२०.</u>**
**<u>नि.क्र. ५७.</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ बाळासाहेब आनंदा निळे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. वाय. बी. हासे यांचेमार्फत शपथेवर सुरु :-</u>**

**०१.** सदरच्या प्रकरणांत मी पुरावाकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो. **<u>नि.क्र. ५७</u>** वर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतीवादी क्र. १ तर्फे त्यांचे स्पेशल मुखत्यार श्री. प्रविण सखाराम बागुल यांच्यामार्फत सुरु -</u>**

**०२.** मी इयत्ता दहावी पास आहे. दावा मिळकतीच्या लगत असलेल्या जमिनीवरील आमचा ताबा सन २००७ मध्ये गेला होता व तो आम्हाला परत सन २०१६ मध्ये मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९५ ते सन २०१३ पर्यंत माझ्याकडे गट क्रमांक ७३६ चा ताबा नव्हता. वादी व प्रतिवादी हे माझे भाउबंध नसुन ते माझे नातेवाईक आहेत. आमच्या गावात वादी व प्रतिवादी हेच माझे नातेवाईक असुन इतर कोणीही नाही. दावा मिळकती संदर्भात झालेल्या खरेदी व्यवहारांबाबत मला माहिती नाही. गट क्रमांक ७३८ मध्ये पाण्याचे बारे होते, याबाबत मला माहित नाही. दावा मिळकत ही विश्वनाथ टपाल हे मजुराकडुन वहिती करून घेत होते. ते गावातील मजुर होते. त्या मजुरांची नावे मला माहित नाही. आमचा प्रतिवादींशी शेतमिळकतीसंदर्भात वाद चालु होता. हे म्हणणे खरे नाही की, आमचा प्रतिवादींशी शेत मिळकतीसंदर्भात वाद चालु होता म्हणुन प्रतिवादींचा बदला घेण्याकरीता मी आजरोजी त्यांच्या विरूध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा ताबा वादींकडे आहे, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ मध्ये वादी व प्रतिवादींमध्ये गावामध्ये समझोता झाला होता. माझी मिळकत मी स्वत: वहिती करतो. सध्या मी कोणतेही पिक घेत नाही. मी मागील दिड वर्षांपासुन माझे शेतात पिक घेतलेले नाही. गव्हाचे पिक घ ेतल्याबाबत पिक पाहणी सदरी नोंद झालेली आहे. ती मी दाखल करू शकतो.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. सहाणे यांच्यामार्फत सुरू :-</u>**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ७३६ ही मिळकत माझ्या नावे नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, माझ्या आजीच्या नावावर आहे. दावा मिळकतीचा ७/१२ मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, दावा मिळकत कोणाच्या नावे आहे, हे मी

सांगु शकणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी पदमाबाई व इतर वादी हे मुंबई येथे वास्तव्यास असतात. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्रमांक ७३८ हा पुर्वी विश्वनाथ टपाल यांच्याकडे होता व त्यानंतर तो सखाराम टपाल यांच्याकडे आला. हे म्हणणे खरे आहे की, विश्वनाथ टपाल नसतांना सखाराम टपाल दावा मिळकत वहिती करत होते. हे म्हणणे खरे नाही की, सखाराम टपाल मयत झाल्यानंतर दावा मिळकत प्रतिवादी वहिती करू लागले. हे म्हणणे खरे आहे की, माझा प्रतिवादींसोबत वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींसोबत वाद असल्यामुळे मी आज त्यांच्याविरूध्द साक्ष देण्याकरीता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी पदमाबाईच्या सांगण्यावरून आज साक्ष देण्याकरीता आलो आहे. हे मला माहित नाही की, विश्वनाथ टपाल यांनी दावा मिळकत सखराम टपाल यांना विसारपावती अन्वये दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात दाखल केलेला पुराव्याकामी प्रतिज्ञालेख वादींच्या वकिलांनी तयार केला व मी केवळ त्यावर सही केली.हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही आजरोजी प्रतिवादींच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.01.29 15:45:00 +0530

**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, संगमनेर.**
**दि. २९/०१/२०२६.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.01.29 15:44:54 +0530

**( प्रसाद बा. जोशी )**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, संगमनेर.**